**अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त असलेल्या गडचिरोली जिल्हयासाठी गट- क व गट-ड (वर्ग ३ व वर्ग-४) साठी सेवेत अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण ठेवण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक :बीसीसी-२००१/३५३/प्र.क्र.१४/२०००/१६ब
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२
दिनांक :-१३ ऑगस्ट २००२.

वाचा :- १)शासन निर्णय,सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०९३/२०६७/प्र.क्र.१४१/९३/१६ब, दिनांक १८/६/१९९४
२) शासन निर्णय,सा.प्र.वि.,क्र.बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६ब, दिनांक १/९/१९९७
३) शासन निर्णय,सा.प्र.वि.,क्र.बीसीसी १०९८/११६/९८/१६ब, दिनांक २२/९/१९९९.

**शासन निर्णय**

शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,दि.१८ जून १९९४ व दिनांक २२ सप्टेंबर १९९९ अन्वये अनुसूचित जमातीची लोकसंख्या तुलनेने अधिक असलेल्या ठाणे,नाशिक,धुळे,यवतमाळ,रायगड,चंद्रपूर गडचिरोली व नंदुरबार या ८ जिल्हयांमध्ये गट 'क' व गट 'ड' (वर्ग-३ व वर्ग-४) मधील पदांवर सरळ सेवा भरतीसाठी अनुसूचित जमातीकरीता वाढीव आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. या वाढीव आरक्षणांतर्गत गडचिरोली जिल्हयासाठी सध्या ठेवण्यात आलेल्या १५% या वाढीव आरक्षणात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावावर आता निर्णय झालेला असून यापुढे गडचिरोली जिल्हयातील गट- क आणि गट- ड ( वर्ग-३ व वर्ग-४ ) मधील ५दे सरळ सेवेने भरण्यासाठी अनुसूचित जमातीकरीता २४% इतके वाढीव आरक्षण लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. याबाबतची बिंदू नामावली स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

२. विहित ७% पेक्षा वाढीव आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास, त्या जागा अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती व इतर मागास वर्गाकरीता असलेले आरक्षण त्या त्या प्रमाणात कमी करुन अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण देण्यात आले असल्यामुळे, त्या प्रवर्गाकरीता असलेल्या आरक्षणानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र. बीसीसी -१०९७/प्र.क्र.०२/९७/१६ब, दिनांक २९ मार्च १९९७ अन्वये भरण्यात याव्यात. मात्र, ७% पेक्षा कमी उमेदवार उपलबध झाल्यास ७% पर्यन्तच्या मर्यादेतील अनुशेष विद्यमान आदेशाप्रमाणे पुढे ओढण्यात यावा.

३ हे आदेश हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( भि.रा.वाळवे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,

सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक,उच्च न्यायालय,मूळ शाखा,मुंबई,
* प्रबंधक,उच्च न्यायालय,अपील शाखा,मुंबई,
* प्रबंधक,लोकायुक्त आणि लोकायुक्त यांचे कार्यालय,मुंबई
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
* प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,
संचालक,समाज कल्याण,पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक,
संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे
संचालक,सेवायोजन,मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती

* पत्राने.